**MHBU130027862025**

दाखल दिनांक :  १४.११.२०२५
नोंदणी दिनांक :  १४.११.२०२५
निकाल दिनांक:  ०२.०५.२०२६
कालावधी      :   ५ महिने१८ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली, यांचे न्यायालयात.**

**(पीठासीन अधिकारी : आय.ए.वाय.ए. खान)**

**सं.फौजदारी खटला क्र. १७३६/२०२५**

**निशाणी क्रमांक ७३**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर,
ता. व  जि. बुलडाणा.  ..... **अभियोगपक्ष**

**- विरुध्द -**

१. विजयराज हरिभाऊ शिंदे,
वय ५५ वर्ष, धंदा - माजी आमदार,

२. सुनिल हसनराव देशमुख,
वय ४२ वर्ष, धंदा - वकिली,

३. सिंधुताई किसनराव खेडेकर,
वय ५५ वर्ष, धंदा - घरकाम,

४. राजेंद्र पांडुरंग होंन्डे,
वय ३८ वर्ष, धंदा - शेती,

५. मंदार भास्करराव बाहेकर,
वय ३९ वर्ष, धंदा - शेती,

६. पद्मनाथ जगदेवराव बाहेकर,
वय ३८ वर्ष, धंदा - शेती,

७. अशोक ज्ञानेश्वर बाहेकर,
वय ४८ वर्ष, धंदा - शेती,
सर्व रा. बुलडाणा,
ता. व जि. बुलडाणा ..... **<u>आरोपी</u>**

**<u>गुन्हा</u>** :- भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, कलम ११ महाराष्ट्र कोविड-१९ विनीयमन २०२० आणि कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ प्रमाणे.

---

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मो. बशीर

आरोपींतर्फे विधीज्ञ कु. जे.डी. कुटे

---

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(घोषीत दि. ०२/०५/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन, २०२० आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ नुसार खटला चालविण्यात येत आहे.

**अभियोग पक्षाचे कथन –**

२. फिर्यादी नंदकिशोर महादेव काळे स.पो.नि. बुलडाणा शहर याने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि. १७.०८.२०२१ रोजी माजी आमदार विजयराज शिंदे यांनी त्यांचे कार्यालय शिवालय येथून मंदिर सर्वसामान्य लोकांसाठी खुले करा अशी मागणी करण्यासाठी मोर्चाचे आयोजन केले होते. त्यानुसार सर्व आरोपी व २० ते २५ पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी शिवालय कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंत मोर्चा काढला. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर एकत्र येऊन टाळ व मुद्रंग वाजवून शासनाच्या धोरणाविरोधात मंदिर सर्वांसाठी खुले करा अशी घोषणाबाजी करुन मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. सदर मोर्चा काढण्याची आरोपींनी कोणतीही परवानगी घेतली नव्हती. आरोपींनी दि. ०९.०८.२०२१ रोजी १.४५ ते ३.०० वाजताचे दरम्यान विनापरवाना मोर्चा काढून व टाळ, ढोलकी वाजवून सोशल डिस्टंसिंगचे पालन न करता जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा काढून घोषणाबाजी केली. त्यानंतर फिर्यादीने पो.स्टे. बुलडाणा शहर येथे फिर्याद नोंदविली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द गुन्हा क्र. ६९८/२०२१, भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ५१(ब) आपत्ती

व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन, २०२० आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ प्रमाणे तपासिक अंमलदार पो.उप.नि. दिलीप पवार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपास टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन, २०२० आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना सदर दोषारापातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा दोषी ठेवण्याइतपत आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन अनुक्रमे नि.क्र. ६८ ते ७२ अन्वये नोंदविण्यात आले आहे.

६. माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, दिनांक १७.०८.२०२१ रोजी आरोपींनी एकत्र येऊन गैरकायद्याची मंडळी जमवून आरोग्य विभागाचा कोवीड–१९ बाबत घातक आजाराचा प्रसार होईल असे कृत्य करु नये या आदेशाचा भंग करुन जमाव जमवून आरोपींनी कोवीड–१९ या आजाराचा प्रसार होईल असे कृत्य केले व त्यायोगे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ३ साथीचे रोग प्रतिबंधक अधिनियम १८९७, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन २०२०, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापण अधिनियम अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केला व त्यायोगे महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. सरकारी अभियोक्ता मो.बशीर मो.नसीर व आरोपीतर्फे वकील कु. जे.डी. कुटे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्रे तपासली.

८. अभियोग पक्षाने एकुण सात साक्षीदार तपासले त्यामध्ये सा.क्र. १ संजय शामसिंग क्षत्रीय यांस नि.क्र. १९ वर, सा.क्र. २ संतोष शामसुंदर जयस्वाल यास नि.क्र. ५२ वर, सा.क्र. ३ भारत दशरथ खंडारे यास नि.क्र. ५४ वर, सा.क्र. ४ विठ्ठल लिंबाजी काळुसे यास नि.क्र. ५६ वर, सा.क्र. ५ प्रिती तुळशीदास बोबडे यास नि.क्र. ५७ वर, सा.क्र. ६ सुधाकर हरीभाऊ गव्हारगुरु यास नि.क्र. ५९ वर, सा.क्र. ७ नंदकिशोर महादेव काळे यास नि.क्र. ६३ वर तपासले.

९. अभियोग पक्षाने आरोपींवर भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७० भादवी, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापण अधिनियम, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन २०२० आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३५ खालील गुन्हा सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने मी सदर कलम पुराव्याचे पुनरुच्चारण करणेकामी खाली प्रमाणे पुनरुत्पादीत करीत आहे.

**<u>Section 269 Negligent act likely to spread infection of disease dangerous to life.</u>**

> Whoever unlawfully or negligently does any act which is, and which he knows or has reason to believe to be, likely to spread the infection of any disease dangerous to life, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or with fine, or with both.

**<u>Section 270 Malignant act likely to spread infection of disease dangerous to life</u>**

Whoever malignantly does any act which is, and which he knows or has reason to believe to be, likely to spread the infection of any disease dangerous to life, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to two years, or with fine, or with both.

**<u>Section 188 Disobedience to order duly promulgated by public servant</u>**

Whoever, knowing that, by an order promulgated by a public servant lawfully empowered to promulgate such order, he is directed to abstain from a certain act, or to take certain order with certain property in his possession or under his management disobeys such direction, shall, if such disobedience causes or tends to cause obstruction, annoyance or injury, or risk of obstruction, annoyance or injury, to any persons lawfully employed, be punished with simple imprisonment for a term which may extend to one month or with fine which may extend to two hundred rupees, or with both; And if such disobedience causes or tends to cause danger to human life, health or

safety, or causes or tends to cause a riot or affray, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or."

**Section 3 of epidemic disease Act.**

(1) Any person disobeying any regulation or order made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code (45 of 1860).

(2) Whoever,—(i)commits or abets the commission of an act of violence against a healthcare service personnel; or(ii)abets or causes damage or loss to any property, shall be punished with imprisonment for a term which shall not be less than three months, but which may extend to five years, and with fine, which shall not be less than fifty thousand rupees, but which may extend to two lakh rupees.

(3) Whoever, while committing an act of violence against a healthcare service personnel, causes grievous hurt as defined in section 320 of the Indian Penal Code to such person, shall be punished with imprisonment for a term which shall not be less than six months, but which may extend to seven years and with fine, which shall not be less than one lakh rupees, but which may extend to five lakh rupees."

**Section 51(b) in The Disaster Management Act, 2005**

(a)obstructs any officer or employee of the Central Government or the State Government, or a person authorised by the National Authority or State Authority or District Authority in the discharge of his functions under this Act; or(b)refuses to comply with any direction given by or on behalf of the Central Government or the State Government or the National Executive Committee or the State Executive Committee or

the District Authority under this Act, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine, or with both, and if such obstruction or refusal to comply with directions results in loss of lives or imminent danger thereof, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to two years.

**Section 11 of The Maharashtra Covid-19 Regulation, 2020.**

These regulations may be called ‘The Maharashtra Covid-19 Regulations, 2020.

No person/institution/organization will use any print or electronic or social media for dissemination of any information regarding Covid-19 without ascertaining the facts and prior clearance of the Commissioner, Health Services, Director of Health Services (DHS-I & II), Director, Medical Education & Research (DMER), or Collector as the case may be. This is necessary to avoid spread of any unauthenticated information and/or rumors regarding Covid-19. If any person/institution/organization is found indulging in such activity, it will be treated as a punishable offence under these Regulations.

“Section 135 makes it an offense to disobey or fail to comply with orders, directions, or notifications issued by the State Government or a police officer under Section 37 of the Act.”

“The offense is considered cognizable if the conditions set by the law are met, allowing a police officer to arrest without a warrant and start prosecution. If these conditions are not met, it becomes a non-cognizable offense.”

"या कलमाचा वापर सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी लागू केलेले नियम आणि कायदे लागू करण्यासाठी केला जातो, जसे की वाहतूक, सभा किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर क्रियाकलापांवर निर्बंध."

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबत</u>** :–

१०. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

११. अभियोगपक्षाच्या वतीने आरोपींवर कलम १८८, २६९, २७० भा.द.वी., कलम ३ साथीचे रोग अधिनीयम, कलम ५१ आपत्ती व्यवस्थापन अधिनीयम, कलम ११ महाराष्ट्र कोविड–१९ विनीयमन २०२० व कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम नुसार गुन्हा सिध्द करणेकामी एकुण ७ साक्षीदार तपासले. सा.क्र. १ संजय शामसिंग क्षत्रीय यांस नि.क्र. १९ वर तपासले. तो घटनास्थळ पंच आहे. त्याने सरतपासात कथन केले की, त्याला पोलिसांनी दि. १८.०८.२०२५ रोजी घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्याची सही त्याच्या गॅरेजजवळ घेतली होती. त्याच्यादेखत कोणताही पंचनामा झाला नाही. सदर साक्षीदाराला फितुर घोषीत करण्यात आले. अभियोग पक्षातर्फे

उलटतपासात त्याने अभियोग पक्षाला सहकार्य होईल असे कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

१२. अभियोग पक्षाने सा.क्र. २ संतोष शामसुंदर जयस्वाल यांस नि.क्र. ५२ वर तपासले. तो घटनास्थळ पंच आहे. त्याने सरतपासात कथन केले की, त्याला पोलिसांनी दि. १८.०८.२०२५ रोजी घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्याची सही त्याच्या गॅरेजजवळ घेतली होती. त्याच्या देखत कोणताही पंचनामा झाला नाही. सदर साक्षीदाराला फितुर घोषीत करण्यात आले. अभियोग पक्षातर्फे त्याने उलटतपासात अभियोग पक्षाला सहकार्य होईल असे कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

१३. अभियोग पक्षाने सा.क्र. ३ भारत दशरथ खंडारे यास नि.क्र. ५४ वर तपासले. तो दि. १७.०८.२०२१ रोजी बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे पोलिस नाईक म्हणून कार्यरत होता. दि. १७.०८.२०२१ रोजी मोर्चा बंदोबस्ताकामी तो व त्याचेसोबत सहा.पो.नि. नंदकिशोर काळे, हे.कॉ. प्रविण मुळे, म.पो.कॉ. प्रीती बोबडे, म.पो.कॉ. संध्या कदम हे १३.०० वाजता मोर्चा बंदोबस्ताकामी शिवालय कार्यालयाजवळ हजर होते. शिवालय कार्यालय हे माजी आमदार विजयराज शिंदे यांचे आहे. सर्व आरोपी व इतर २० ते २५ इसम यांनी

हातात टाळ व दंग घेऊन आरोपी विजयराज शिंदे यांच्या शिवालय कार्यालयापासून मोर्चा काढण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी घोषणा दिल्या की, मंदीर दर्शनासाठी खुले करा. आरोपींना मोर्चाची परवानगी नव्हती. घटनेच्या वेळी राज्यात व देशात कोरोना महामारी होती. त्यावेळी कोरोनाविषयीचे मा. जिल्हाधिकारी साहेबांचे आदेश होते. आरोपींनी कोरोना विषयीचे मा. जिल्हाधिकारी साहेबांच्या आदेशाचे भंग केले.

१४. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो आरोपीला ओळखत नाही. आरोपींना कलम १४९ सीआरपीसी ची नोटीस बजावली होती किंवा नाही हे त्याला माहीत नाही. त्याने सदर घटनेचे फोटो अभिलेखावर दाखल केले नाही. मा. जिल्हाधिकारी यांचा आदेश दि. १२.०८.२०२१ चा होता. सदरच्या मोर्चामध्ये कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीची तक्रार आली नाही. त्याने मान्य केले की, त्याच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. घटनेच्या वेळी कॉग्रेस पक्षाचे सरकार होते. सरतपासात त्याने मान्य केले की, घटनेच्या वेळी आरोपींव्यतिरीक्त २० ते २५ इसम टाळ व मृदंग घेऊन होते. परंतु, त्या इसमाला आरोपी करण्यात आले नाही. सदर साक्षीदाराने राजकीय दबावातून साक्ष दिल्याचे दिसून येते.

१५. अभियोग पक्षाने सा.क्र. ४ विठ्ठल लिंबाजी काळूसे यास नि.क्र. ५६ वर तपासले. तो दि. १७.०८.२०२१ रोजी बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे

पोलिस नाईक म्हणून कार्यरत होता. दि. १७.०८.२०२१ रोजी मोर्चा बंदोबस्ताकामी तो व त्याचेसोबत इतर पोलिस कर्मचारी शिवालय कार्यालयाजवळ हजर होते. शिवालय कार्यालय हे माजी आमदार विजयराज शिंदे यांचे कार्यालय आहे. सर्व आरोपी व इतर २० ते २५ इसम हातात टाळ व दंग वाजवून आरोपी विजयराज शिंदे यांच्या शिवालय कार्यालयापासून सुरुवात केली. तसेच मंदीर दर्शनासाठी खुले करा अशी घोषणा दिली. आरोपींना मोर्चाची परवानगी नव्हती. घटनेच्या वेळी राज्यात व देशात कोरोना महामारी होती त्यामुळे मा. जिल्हाधिकारी साहेबांचे कोरोना संदर्भात जमावबंदीचे आदेश होते.

१६. उलटतपासात त्याने मान्य केले की, घटना घडली त्यावेळी तो घटनास्थळावर हजर होता. पद्मनाभ बाहेकर, मंदार बाहेकर, अशोक बाहेकर, राजेंद्र हांडे हे घटनेच्या दिवशी हजर होते, परंतु त्यांची नावे फिर्याद मध्ये आरोपी म्हणून घेण्यात आली नाही. नंतर दोषारोपपत्रात सामाविष्ठ करण्यात आली . घटनेच्या वेळी कोणत्याही इसमाची तक्रार त्याच्याकडे आली नाही. त्याच्या समक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला नाही. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या वेळी महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार होते. सबब, राजकीय दबावातून त्याने साक्ष दिल्याचे दिसून येते.

१७. अभियोग पक्षाने सा.क्र. ५ प्रिती तुळशीदास बोबळे यास नि.क्र. ५७

वर तपासले. सदर साक्षीदार पोलिस आहे. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले की, घटनेच्या वेळी ती हजर होती. आरोपीने जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे कोरोना आजार पसरवू नये व जमावबंदी करु नये अशा आदेशाचे उल्लंघन केले. उलटतपासात तिने मान्य केले की, आरोपी पद्मनाभ बाहेकर, मंदार बाहेकर, अशोक बाहेकर हे घटनेच्या दिवशी हजर होते. परंतु, त्यांचे फिर्यादमध्ये आरोपी म्हणून नाव दिसून येत नाही. गुन्ह्याबाबत कोणत्याही इसमाने तक्रार दिली नाही. याव्यतिरीक्त इतर सुचक प्रश्नांचे उत्तरे नाकारार्थीमध्ये दिले.

१८. अभियोग पक्षाने सा.क्र. ६ सुधाकर हरिभाऊ गव्हाळगुरु यास नि.क्र. ५९ वर तपासले. सदर साक्षीदाराने गुन्हयाचा तपास केला. त्याने घटनास्थळ पंचनामा केला व दोन पंचांच्या सहया घेतल्या. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ६० वर आहे. जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या आदेशाच्या प्रतला नि.क्र. ६१ देण्यात आले. बंदोबस्तासाठी इतर पोलीस अधिकारीला घटनास्थळी ठेवण्यात आले. बंदोबस्त चार्टला नि.क्र. ६२ देण्यात आले. सदर साक्षीदाराने सुध्दा मान्य केले की, आरोपी पद्मनाभ बाहेकर, मंदार बाहेकर, अशोक बाहेकर हे घटनेच्या दिवशी हजर होते. परंतु, त्यांची नावे फिर्यादमध्ये आरोपी म्हणून दिसून येत नाही. गुन्ह्याबाबत कोणत्याही इसमाने तक्रार दिली नाही. सर्व साक्षीदार पोलिस साक्षीदार आहेत. सदर साक्षीदाराने आरोपींना कलम १४९ सीआरपीसीची नोटीस

बजावली होती असे मान्य केले परंतु सदर नोटीस दोषारोपपत्रामध्ये समाविष्ट करण्यात आली नाही. सदर साक्षीदाराने मान्य केले की, तो घटनास्थळी घटनेच्या वेळी हजर होता. याव्यतिरीक्त इतर सुचक प्रश्नांची उत्तरे त्याने नाकारार्थीमध्ये दिली.

१९. अभियोग पक्षाने सा.क्र. ७ नंदकिशोर महादेव काळे, पोलीस निरीक्षक यास नि.क्र. ६३ वर तपासले. सदर साक्षीदाराने गुन्ह्याबाबत फिर्याद दिली. ती फिर्याद नि.क्र. ६४ आणि ६५ वर आहे. जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे आदेश नि.क्र. ६१ वर आहे. बंदोबस्त चार्ट नि.क्र. ६२ वर आहे. उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, घटनास्थळ पंचनामा करतेवेळी तो हजर होता. सदर साक्षीदाराने सुध्दा मान्य केले की, आरोपी पद्मनाभ बाहेकर, मंदार बाहेकर, अशोक बाहेकर हे घटनेच्या दिवशी हजर होते. परंतु, त्यांची नावे फिर्यादमध्ये आरोपी म्हणून नाव दिसून येत नाही. आरोपीला गुन्हयाबाबत नोटीस पाठविण्यात आली होती किंवा नाही हे त्याला माहीत नाही. त्याने हे सुध्दा मान्य केले की, जिल्हाधिकारी यांचे आदेश वेळेनुसार दुकान चालू ठेवण्याचे होते. कोणत्याही इसमाने गुन्हयाबाबत तक्रार दिली नाही. याव्यतिरीक्त इतर सुचक प्रश्नांची उत्तरे त्याने नाकारार्थीमध्ये दिली.

२०. वरील पुराव्याचे व कायद्याचे एकंदर अवलोकन करता असे दिसून

येते की, फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दिली की, दि. १७.०८.२०२१ रोजी आरोपी विजयराज शिंदे याचे मार्फत सर्व मंदीरे सर्व सामान्यांसाठी खुले करण्यासाठी त्याचे कार्यालयापासून जिल्हाधिकारी बुलडाणा याचे कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता. वरील नमुद साक्षीदारांपैकी साक्षीदार क्र. १ व २ घटनास्थळ पंच सोडून सर्व पोलीस साक्षीदाराने मान्य केले की, घटनेच्या वेळी ते हजर होते. परंतु त्यांनी कसलेही फोटोग्राफ, मोबाईलमध्ये चित्रीकरण, सीसीटीव्हीची पाहणी इत्यादी केली नाही. आरोपींनी कोणते मंदीर व कोणत्या ठिकाणाचे मंदीर उघडले ते अभिलेखावर आले नाही. आरोपीने गर्दीकरुन मोर्चा काढला व ढोलकी वाजविली असे फिर्यादमध्ये नमुद करण्यात आले. सदर ढोलकी जप्त करण्यात आली नाही. तसेच फिर्यादमध्ये व साक्षीदारांच्या साक्षीमध्ये असे नमुद व कथन करण्यात आले की, आरोपींनी जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या कार्यालयासमोर एकत्र आले व घोषणाबाजी केली की, मंदीर सर्वांसाठी खुले करा व तसे निवेदन जिल्हाधिकारी बुलडाणा यांना दिले. परंतु, सदर निवेदनाची प्रत सुध्दा अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. सदर साक्षीदार क्र. ७ फिर्यादी व सा.क्र. ६ तपासीक अमलदार यांनी कथन केले की, घटनेच्या वेळी आरोपींव्यतिरीक्त २० ते २५ लोक होते. परंतु, सदर लोकांपैकी कोणत्याही इसमाला आरोपी करण्यात आले नाही. सबब, अभियोग पक्षाच्या कहाणीवर शंका

निर्माण करते की, आरोपींनी मोर्चा काढला होता. कोणत्याही इसमाने गुन्ह्याबाबत तक्रार केली नाही. याव्यतिरीक्त फिर्याद दोषारोपपत्रामधील कोणत्या आरोपीने कोणत्या पोलीस अधिका–यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केला व त्यांच्या आदेशाची अवमानना केली हे अभिलेखावर आले नाही. तसेच कोणत्या आरोपीच्या कृत्यामुळे व सदर आरोपींच्या बेकायदेशीर जमावबंदी व मोर्चामुळे कोरोना आजार झाल्याबाबत तक्रार दिली गेली नाही. याव्यतिरीक्त आरोपी पद्मनाभ बाहेकर, मंदार बाहेकर, अशोक बाहेकर हे घटनेच्या दिवशी हजर होते. परंतु, त्यांचे फिर्यादमध्ये आरोपी म्हणून नाव दिसून येत नाही. अभियोग पक्षातर्फे जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे आदेश मोर्चा आंदोलन करु नये तसे आदेश नि.क्र. ६१ वर आहे. परंतु, तपासीक अमलदाराने उलटतपासात मान्य केले की, आरोपींना कलम १४९ सीआरपीसीची नोटीस देण्यात आली, परंतु सदर नोटीस अभिलेखावर दाखल करण्यात आली नाही. कायद्याने आरोपींना नोटीस देणे गरजेचे आहे. कोणतेही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आले नाही. घटनास्थळ पंच सा.क्र. १ संजय शामसींग क्षत्रीय, नि.क्र. १९ व संतोष शामसुंदर जयस्वाल सा.क्र. २ नि.क्र. ५२ यांना फितुर घोषीत करण्यात आले. त्या दोघांनीही अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. इतर सर्व साक्षीदार पोलिस साक्षीदार आहेत. सदर साक्षीदारांनी उलटतपासात मान्य केले की, आरोपी भाजपाचे कार्यकर्ते आहेत व

घटनेच्या वेळी महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार होते. परंतु, वरील पुरावा व तपास पाहिल्यानंतर असे दिसून येते की, आरोपींवर गुन्हा केवळ राजकीय दबावाखाली करण्यात आला असे दिसून येते. भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम १८८ नविन कलम २२३ बी.एन.एस. नुसार, सार्वजनिक सेवकाने (उदा. पोलीस, सरकारी अधिकारी) जारी केलेल्या कायदेशीर आदेशाची अवज्ञा केल्यास शिक्षा होते. या गुन्ह्यासाठी शिक्षा आदेशाचे पालन न केल्यामुळे मानवी जीव, आरोग्य किंवा सुरक्षिततेस किती धोका निर्माण झाला आहे यावर अवलंबून असते. जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक सेवकाने जारी केलेला, ज्याचे पालन करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे असा आदेश जाणूनबुजून मोडते, तेव्हा ती व्यक्ती कलम १८८ अंतर्गत गुन्हा करते. या गुन्ह्याचा उद्देश सार्वजनिक सेवकाने जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करणे हा असतो. परंतु कोणत्या अधिका–याने कशाचे पालन करण्याचे आदेश होते याचा पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. “Delhi High Court **Shri Bhoop Singh Tyagi vs State,** dated 13th March, 2002 Equivalent citations: 2002IVAD(DELHI)419, 2002CRILJ2872, 97(2002)DLT374, 2002(62) DRJ870.

In this case, the Court was dealing with an FIR u/s 188 against the petitioner for having allegedly disobeyed the Police Commissioner’s orders contained in a notification claimed to

have been published in the newspaper. The Court, while quashing the proceedings against the petitioner, was pleased to hold as under:

" The stand of the police is that the requisite knowledge must be attributed to the accused because the Police Commissioner's order was published in some newspapers and handbills, etc. This in our view would not meet the requirement, because a number of events may be reported in newspapers but that would not attribute or convey knowledge of such events to all readers..."

...We accordingly hold that the petitioner could not be attributed knowledge of the Commissioner's order contained in the notification and therefore the impugned FIR could not be said to make out any offence against him under Sec. 188, IPC."

२१. वरील कायद्याचे अवलोकन केल्यावर असे दिसुन येते की, आरोपीला लोकसेवकाने काढण्यात आलेल्या आदेशाची सुचना व माहिती इ. द्यायला पाहिजे. परंतु, प्रस्तूतच्या खटल्यात आरोपींना अशी नोटीस व सुचना देण्यात आली असे अभिलेखावर आले नाही. त्यामुळे माझे असे मत आहे की, अभियोग पक्षाने कलम १८८ भा.द.वी. नविन कलम २२३ बी.एन.एस प्रमाणे आरोपींवर गुन्हा सिध्द केला नाही. त्यामुळे कलम ३ साथीरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ५१(ब), कलम ११ महाराष्ट्र

कोवीड कायदा २०१९, कलम १३५ मुंबई पोलिस कायदा सिध्द करण्यात आले नाही. तसेच आरोपींनी निष्काळजीपणाने जाणूनबुजून माहिती असताना कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढविला व लोकांच्या जिवाला धोका निर्माण केला त्यामुळे कलम २६९ भादवी अभियोग पक्षाने सिद्ध केले नाही. तसेच आरोपीने कसलेही घातक कृत्य केले नाही ज्यामुळे धोकादायक आजाराचे विषाणू पसरविले जाईल व त्यामुळे कलम २७० भादवी प्रमाणे गुन्हा सिद्ध केला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नाकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ०३ करिता.**

२२. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७० भादवी कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापण अधिनियम कलम ५१(ब), आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३५, कलम ११ महाराष्ट्र कोवीड कायदा २०१९ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे सर्व आरोपी निर्दोष म्हणुन मुक्त करण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१) आरोपी क्र.१ विजयराज हरिभाऊ शिंदे, आरोपी क्र.२ सुनिल हसनराव

देशमुख, आरोपी क्र.३ सिंधुताई किसनराव खेडेकर, आरोपी क्र.४ राजेंद्र पांडुरंग होंन्डे, आरोपी क्र.५ मंदार भास्करराव बाहेकर, आरोपी क्र.६ पद्मनाथ जगदेवराव बाहेकर, आरोपी क्र.७ अशोक ज्ञानेश्वर बाहेकर यांच्याविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २६९ आणि २७०, कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापण अधिनियम कलम ५१(ब), कलम ११ महाराष्ट्र कोवीड कायदा २०१९ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३५ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यांत येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी कलम ४३६(अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे वैयक्तीक जातमुचलका र. रु. ३,०००/– ची जमानत द्यावी.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.05.02 18:23:43 +0530

**(आय.ए.वाय.ए. खान)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चिखली.

दिनांकः- ०२.०५.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli |
| Date | : | 02/05/2026 |
| Signed by P. O. on | : | 02/05/2026 |
| Uploaded on | : | 02/05/2026 |